# स्थानिक संस्था कर (LBT)

**श्री. विलास कानडे**

सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर

localbodytax@punecorporation.org

**प्रश्न १)** **नोंदणी कोणी करावी व त्यासाठी उलाढालीची असणारी मर्यादा किती आहे?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नोंदणीकरीता असणाऱ्या उलाढालीमध्ये मे. राज्य शासनाने दि. ०१/०८/२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सुधारणा केलेली असून, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ नुसार दि. १/०८/२०१५ पासून ज्या व्यापाऱ्याची पुणे महानगरपालिका परिक्षेत्रात रुपये ५० कोटी व त्यापेक्षा जास्त वार्षिक खरेदी अथवा विक्रीची उलाढाल असेल अशा व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कराची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

**प्रश्न २)** **एखादया व्यापाऱ्याने त्याचा व्यवसाय हस्तांतरित केला असेल आणि जर त्याच्याकडे स्थानिक संस्था कराची बाकी असेल अशा वेळी स्थानिक संस्था कर कोण भरेल?**

उत्तरः- ज्या व्यक्तिकडे असा व्यवसाय हस्तांतरित केला आहे, ती व्यक्ति स्थानिक संस्था कर भरण्यास पात्र राहिल.

**प्रश्न ३)** **एखादया व्यापाऱ्याची एकाच नावाने व्यवसायाची ठिकाणे एकापेक्षा जास्त असतील तर नोंदणीसाठी किती अर्ज करावेत?**

उत्तरः- अशा व्यापाऱ्याने नोंदणीसाठी एकच अर्ज करावा. परंतू, त्यामध्ये व्यवसायाच्या अन्य ठिकाणाची नोंदी नमूद करावयात व अशा प्रत्येक व्यावसायाच्या ठिकाणी नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती स्थानिक संस्था कर कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेवून त्या व्यवसायाच्या प्रत्येक ठिकाणी ठळक जागी लावाव्यात.

**प्रश्न ४)** **नोंदणी प्रमाणपत्र हस्तांतरित करता येईल काय?**

उत्तरः- नोंदणी प्रमाणपत्र हस्तांरित करता येणार नाही.

**प्रश्न ५)** **धंद्यामध्ये/ व्यवसायामध्ये काही बदल करावयाचा झाल्यास काय करावे?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम १४ (३) अन्वये धदयांमध्ये /व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करावयाचा झाल्यास किंवा बदल झाला असल्यास त्याबाबतची लेखी माहिती आयुक्त यांना देणे बंधनकारक असून, त्याबाबत आयुक्त आवश्यक त्या सुधारणा करुन नव्याने प्रमाणपत्र देतील. उदा. आयात करावयाच्या वस्तूमध्ये बदल, भागीदारामध्ये बदल इ.

**प्रश्न ६)** **नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे काय?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम १७ अन्वये ज्या व्यवसायिकांना व्यवसाय बंद करावयाचा आहे किंवा ज्या व्यवसायिकानी आपला व्यवसाय बंद केला आहे, अथवा हस्तांतरित केला आहे याबाबत लेखी नमुन्यामध्ये अर्ज करणे बंधनकारक आहे.

**प्रश्न ७) एखादया व्यापाऱ्याने धंदयाच्या नावामध्ये बदल केला असेल किंवा जर ती भागीदारी संस्था असेल आणि तिचे विसर्जन न करता रचनेत बदल केला असेल किंवा तो विश्वस्त व्यवस्थेचा विश्वस्त असेल आणि त्या विश्वस्तामध्ये बदल झाला असेल किंवा तो पाल्याचा पालक असेल व पालकामध्ये बदल झाला असेल तर अशा वेळी परत नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता आहे काय?**

उत्तरः- नाही. केवळ झालेल्या बदलाबाबतची सविस्तर माहिती व्यापाऱ्याने/नोंदणीधारकाने स्थानिक संस्था कर विभागास लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक असून, त्यानंतर अशा बदलाबाबत खातरजमा करुन नोंदणी प्रमाणपत्रामध्ये त्याप्रमाणे बदल करण्यात येतील.

---

**प्रश्न ८) नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे/झाल्यामुळे नोंदणी प्रमाणपत्र रद्द झाल्याच दिनांकापुर्वी जर त्या व्यावसायिकाकडे स्थानिक संस्था कर/दंड व्याज इ. ची रक्कम बाकी असेल अशा वेळी अशी रक्कम कोण भरेल?**

उत्तरः- अशी रक्कम भरण्याची जबाबदारी ही संबंधित नोंदणीधारकाची राहील.

---

**प्रश्न ९) धंदयाच्या व्यवस्थापकाचे नाव व्यापाऱ्याने जाहीर करणे आवश्यक आहे काय?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नोंदणीधारकाने स्थानिक संस्था कर नियम १८ नुसार १ महिन्याच्या आत व्यवस्थापकाचे नाव "नमुना च" प्रतिज्ञापत्रानुसार आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे.

---

**प्रश्न १०) एखादया नोंदणीकृत व्यापाऱ्याने शहरातील इतर व्यापाऱ्यांकडून करयोग्य माल खरेदी केला असेल अशावेळी माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने काय करावे?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम २१ व २२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शहरातील ज्या व्यापाऱ्याकडून करयोग्य माल खरेदी केलेला आहे, त्या व्यापाऱ्याकडून माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने त्या मालाचे बिजक व प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

---

**प्रश्न ११) मनपा क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाने मनपा क्षेत्रातील कोणत्याही इतर व्यावसायिकास माल विकला असेल तर त्याबाबत विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने काय करावे?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम २२ नुसार अशा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने बिजके व प्रमाणपत्रे माल खरेदी करणाऱ्यास देणे बंधनकारक आहे. तसेच खरेदी करणाऱ्या व्यावसायिकाची नोंद त्याच्याकडील खरेदी विक्री रजिस्टरमध्ये ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये त्याचा संपुर्ण पत्ता, त्याच्या धांचे स्वरुप व त्याच्याकडील व्यवसायाचा स्थानिक संस्था कराचा नोंदणी क्रमांक याचा समावेश असेल.

---

**प्रश्न १२) रास्त बाजार मूल्य निर्धारित करण्याचे अधिकार आयुक्त यांना आहेत काय?**

उत्तरः- होय. स्थानिक संस्था कर नियम २५ अन्वये ज्यावेळी रास्त बाजारमूल्य निर्धारित करणे आवश्यक वाटेल अशावेळी माल आयात करणाऱ्या व्यापाऱ्याचे म्हणणे ऐकून घेऊन रास्त बाजारमूल्य निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त यांना आहेत.

**प्रश्न १३)** **विवरणपत्र सादर करण्याच्या पद्धती कोणत्या आहेत?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम २९ नुसार प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायिकाने "नमुना च" मध्ये नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने यथोचितरित्या स्वाक्षरी केलेले संबंधित वर्षातील वार्षिक विवरणपत्र वर्ष समाप्तीनंतर ९० दिवसांच्या आत आयुक्तास सादर करावे.

**प्रश्न १४)** **स्थानिक संस्था कराची रक्कम केव्हा भरावी?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम ४० (क) नुसार स्थानिक संस्था कराची रक्कम तो महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या २० तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे.

**प्रश्न १५)** **एखादया व्यापाऱ्याने नोंदणी न करता व्यापार चालू ठेवला असेल अशा वेळी काय कारवाई होऊ शकेल?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम ४८ (क) नुसार ज्या व्यापाऱ्याने नोंदणी न करता व्यवसाय सुरु ठेवला असल्यास त्याने आयात केलेल्या मालावर जेवढा स्थानिक संस्था कर होईल, त्याच्या पाच पट रक्कम त्याच्याकडून वसुल करण्यात येईल.

**प्रश्न १६)** **एखादया व्यापाऱ्याने जाणूनबुजून चुकीची, खोटी परताव्याची मागणी केल्यास अशावेळी काय तरतूद आहे?**

उत्तरः- अशाबाबत स्थानिक संस्था कराच्या दोन पट दंड वसूल करण्याची तरतूद आहे.

**प्रश्न १७)** **ज्या तारखेस स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक आहे त्या तारखेस स्थानिक संस्था कर भरला नाही तर काय तरतूद आहे?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम ४८ (३) (एक) अन्वये असा कर भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर दरमहा २% प्रमाणे व्याज वसुल करण्याची तरतूद आहे.

**प्रश्न १८)** **एखादया व्यापाऱ्याने स्थानिक संस्था कर भरण्यापोटी खोटी बिले, खोटी उद्घोषणा प्रमाणपत्रे, खोटी कागदपत्रे सादर केल्यास अशावेळी काय तरतूद आहे?**

उत्तरः- स्थानिक संस्था कर नियम ४८ (४) (क) अन्वये स्थानिक संस्था कराऐवढी रक्कम वसुल करण्याची तरतूद आहे.

**प्रश्न १९)** **स्थानिक संस्था कराच्या सॉफ्टवेअरमध्ये सध्या कोणत्या सुविधा सुरु आहेत?**

उत्तरः-
१. स्थानिक संस्था कराची नोंदणी करणे. (ऑनलाईन व ऑफलाईन)
२. स्थानिक संस्था कराची रक्कम भरणे. (ऑनलाईन व ऑफलाईन)
३. वार्षिक विवरणपत्र दाखल करणे. (ऑनलाईन व ऑफलाईन)
४. स्थानिक संस्था कर परतावा करणे.

**प्रश्न २०)** **स्थानिक संस्था कर कोणत्या प्रकारे व कोठे भरता येतो?**

उत्तरः-
१. स्थानिक संस्था कर हा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने भरता येतो.
२. हा कर एच.डी.एफ.सी.बँक, आय.सी.आय.सी.आय बँक, इंडसइंड बँक, यस बँक, बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या पुणे मनपा हद्दीतील कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरता येतो. तसेच या व्यतिरिक्त ज्या बँका आयुक्त वेळोवेळी पदनिर्देशित करतील त्या बँकांमध्ये देखील कराचा भरणा करता येईल.
३. स्थानिक संस्था कराचा ऑनलाईन भरणा करावयाचा झाल्यास संबंधित

व्यावसायिकास स्थानिक संस्था कर कार्यालयाकडून युजर आयडी व पासवर्ड घेऊन त्याप्रमाणे चलन जनरेट करुन बँकेत भरणा करता येईल.

**प्रश्न २१) स्थानिक संस्था कराची रक्कम कशी भरता येईल?**

उत्तरः- स्थानिक संस्था कराची रक्कम चलनाद्वारे रोख स्वरुपात, डिमांड ड्राफ्ट, धनादेश, नेट बँकिंग, आरटीजीएस व एनएफटीएस द्वारे पुणे महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या बँकामध्ये भरता येईल.

**स्थानिक संस्था कर विषयक अधिक माहिती पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध असून, आपल्या काही सूचना असल्यास localbodytax@punecorporation.org या ई–मेलवर संपर्क साधावा.**